WESMACH
Western Maharashtra Chamber of Commerce Industries, Agro & Education

व्यापार-उद्योग-कृषी-शिक्षण क्षेत्राच्या विकासासाठी कटीबध्द - कोल्हापूर

संपादक : ललित गांधी

# चेंबर पत्रिका

• मुंबई • पुणे • नाशिक • नगर • सातारा • सांगली • सोलापूर • रायगड • रत्नागिरी • सिंधुदुर्ग • कोल्हापूर

वर्ष : ८ ▸ अंक : ०९ ▸ डिसेंबर २०१७ ▸ पाने : २० ▸ मुल्य १०/- ▸ वार्षिक मुल्य १०० रूपये

सस्नेह निमंत्रण

KCCI
KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE & INDUSTRIES

## कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज

## वार्षिक सर्वसाधारण सभा

मंगळवार दि. १२ डिसेंबर २०१७
सकाळी ९.३० वाजता

स्थळ
राजर्षि शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर

## निर्याती विषयी ... सर्व काही....

## विशेष परिसंवाद

KCCI KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE & INDUSTRIES
IMC Chamber of Commerce & Industry
WESMACH Western Maharashtra Chamber of Commerce Industries, Agro & Education Wings For Nation !

यांच्या संयुक्त विद्यमाने

सहभाग

एक्ज़िम बैंक EXIM BANK भारतीय निर्यात-आयात बैंक EXPORT-IMPORT BANK OF INDIA

ECGC (A Government of India Enterprise)

MINISTRY OF COMMERCE AND INDUSTRY DIRECTOR GENERAL OF FOREIGN TRADE
सत्यमेव जयते

मंगळवार दि. १२ डिसेंबर २०१७
KCCI-AGM नंतर लगेचच
सकाळी १०.०० वा.
राजर्षि शाहू स्मारक भवन,
दसरा चौक, कोल्हापूर

# कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज

## वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज'च्या सभासदांना कळविणेत येते की, संस्थेची 'वार्षिक सर्वसाधारण सभा' **मंगळवार दि. १२ डिसेंबर २०१७ रोजी सकाळी ९.३० वाजता राजर्षी शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर** येथे आयोजित केली आहे.

### सभेपुढील विषय

१) मागील सभेचे प्रोसिडींग वाचून कायम करणे.

२) दि. ०१/०४/२०१६ ते दि. ३१/०३/२०१७ अखेरच्या कालवधीचे ताळेबंद, त्या तारखे अखेरच्या कालावधीचे उत्पन्न खर्च पत्रक, त्यावरील हिशोब तपासणीस यांचा अहवाल आणि कार्यकारी मंडळाचा वार्षिक अहवाल मंजूर करणे.

३) सन २०१७-१८ या कालावधीसाठी ऑडीटर्स यांची नेमणूक करणे व त्यांचा मेहनताना ठरवणे.

४) मा. अध्यक्ष यांचे परवानगीने ऐन वेळच्या विषयांवर चर्चा करणे.

तरी सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही विनंती.

कोल्हापूर
दिनांक : २६/११/२०१७

कार्यकारी मंडळाच्यावतीने

ललित गांधी
अध्यक्ष

**सभासदांना नम्र विनंती**

१) अहवाल, ताळेबंद वगैरेसंबंधी काही प्रश्न विचारावयाचे असतील तर ते दि. ०९ डिसेंबर २०१७ पर्यंत चेंबरच्या ऑफिसमध्ये पोहोचतील अशा रितीने लेखी पाठवावेत.

२) वार्षिक सभेस दिलेल्या वेळेत आवश्यक गणपूर्ती न झाल्यास सभा अर्ध्या तासासाठी तहकुब करण्यात येईल. अर्ध्या तासानंतर त्याच ठिकाणी सभेचे कामकाज सुरू केले जाईल अशा सभेस गणपुर्तीची आवश्यकता असणार नाही.

## संपादकीय

# अध्यक्षीय मनोगत....

'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज' चा ३४ वा वार्षिक अहवाल आपल्यासमोर सादर करताना मला मनापासून आनंद होत आहे.

कोल्हापूर जिल्ह्याची व्यापार-उद्योग-सेवा क्षेत्राची शिखर संस्था म्हणून जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासामध्ये चेंबरची भूमिका अत्यंत महत्वपूर्ण आहे.

आपण सर्वांनी एकत्र जिल्ह्याच्या या शिखर संस्थेचे नेतृत्व करण्याची जबाबदारी सोपवलीत, ती जबाबदारी माझ्या सर्व पदाधिकारी व कार्यकारीणीच्या सहकार्याने जबाबदारीने पार पाडण्याचा यशस्वी प्रयत्न पहिल्या दिवसापासून करीत आहे.

देशाची अर्थव्यवस्था, दुरगामी बदलांच्या माध्यम ातुन एका संक्रमण काळातुन वाटचाल करीत आहे, नोटबंदी, जीएसटी, रेरा या यासारखे महत्वपूर्ण बदल या काळात झाले आहेत.

व्यापार-उद्योगामध्ये ऑनलाईन शॉपिंग पोर्टल सारख्या तंत्रज्ञान आधारीत संकल्पना विस्तारत आहेत. या बदलामध्ये छोट्यात छोट्या व्यापारी-उद्योजकांना संरक्षित करणे हे एक मोठे आव्हान आपणा सर्वांसमोर आहे.

जिल्ह्याच्या एकूणच विकासासाठी पायाभूत सुविधांचा विकास व विस्तार मोठ्या प्रमाणात करणे आवश्यक आहे. रस्ते, वाहतुक, रेल्वे, विमानसेवा या सर्वच क्षेत्रांच्या विकासासाठी चेंबर विविध स्तरावर सक्रियपणे कार्यरत आहे. लवकरच याचे सकारात्मक परिणामही आपल्याला दिसू लागतील याचा विश्वास आहे.



गेल्या वर्षभरात चेंबरने विविध स्तरावर केलेल्या कार्याचा सचिव संक्षिप्त अहवाल आपल्यासमोर ठेवत आहे. आपल्या सूचनांचे स्वागत आहे व आपला सक्रीय सहभाग अपेक्षित आहे.

**ललित गांधी,**
संपादक तथा राष्ट्रीय अध्यक्ष

---

# KCCI कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज

KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE & INDUSTRIES

## कार्यकारिणी मंडळ २०१७-२०२०

**श्री. ललित गांधी**, अध्यक्ष
**श्री. संजय शेटे**, उपाध्यक्ष
**श्री. चंद्रकांत जाधव**, उपाध्यक्ष
**श्री. जयेश ओसवाल**, मानद सचिव
**श्री. हरीभाई पटेल**, मानद सचिव
**श्री. धनंजय दुग्गे**, मानद सचिव
**श्री. शिवाजीराव पोवार**, मानद सचिव
**श्री. संजय पाटील**, खजानिस

### कार्यकारी सदस्य

**श्री. आनंद माने**
**श्री. प्रदीपभाई कापडीया**
**श्री. सुरेंद्र जैन**
**श्री. महेश धर्माधिकारी**
**श्री. नयन प्रसादे**
**श्री. भरत ओसवाल**
**श्री. दिलीप मोहीते**
**श्री. विजय मेनन**
**श्री. दिनेश बुधले**
**श्री. प्रकाश केसरकर**
**श्री. शिवराज जगदाळे**
**श्री. योगेश कुलकर्णी**
**श्री. वैभव सावर्डेकर**
**श्री. राहुल नष्टे**
**श्री. संदीप अथणे**

### स्विकृत सदस्य

**श्री. धनाजी पाटील**
**श्री. नितिन धूत**
**श्री. सुरेश गायकवाड**
**श्री. उदयसिंह निंबाळकर**
**श्री. तौफीक मुल्लाणी**
**श्री. संभाजीराव पोवार**
**श्री. सुजित चव्हाण**
**श्री. प्रकाश मालाडकर**
**श्री. रमेश कारवेकर**
**श्री. अजित होनोले**
**श्री. सागर लाड**
**सौ. सीमा शहा**

### निमंत्रित स्विकृत सदस्य

**श्री. बाबासो कोंडेकर**, अध्यक्ष, KEA
**श्री. राजाराम पाटील**, अध्यक्ष, SMAK
**श्री. हरिश्चंद्र धोत्रे**, अध्यक्ष, MAKH
**श्री. महेश यादव**, अध्यक्ष, PBAK
**श्री. सुरजितसिंग पवार**, अध्यक्ष, GOSHIMA
**श्री. हिंदुराव कामते**
**श्री. रमेश लालवाणी**
**श्री. रघुनाथ थोरात**
**श्री. राजीव परीख**
**श्री. श्रीकांत दुधाणे**
**श्री. नरेंद्र माटे**
**श्री. विनोद डुणूंग**
**श्री. वासुदेव देशिंगकर**
**श्री. राजेंद्र मालू**
**श्री. सुरेश इंग्रोळे**
**श्री. राजेंद्र जाधव**
**श्री. सुनिल काळे**
**श्री. अतुल शहा**
**श्री. अरूण हत्ती**
**श्री. कांतीलाल पटेल**
**श्री. सुधीर खराडे**
**श्री. हितेंद्र पटेल**
**श्री. संजीव चिपळूणकर**
**श्री. महेश सामंत**
**श्री. एम. बी. शेख**
**श्री. संदिप नष्टे**

# FINANCIAL REPORT AS ON 31st MARCH, 2017

*SCHEDULE VIII*
*[ Vide Rule 17 (1) ]*
**The Bombay Public Trusts Act, 1950**

Name of the Public Trust : **KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE AND INDUSTRIES** Registration No. - **MAHA/29783/KOP**
**Balance Sheet as at 31-03-2017**

| LIABILITES & ADVANCES | AMOUNT | AMOUNT | PROPERTY AND ASSETS | AMOUNT | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| **Trust Funds or Corpus :-** | | | **Immovable Properties:- (at cost)** | | |
| Balance as per last Balance Sheet | 13,40,994.53 | | Balance as per last Balance Sheet | 0.00 | |
| Adjustment during the year | 3,82,000.00 | 17,22,994.53 | Additions during the year | 0.00 | |
| | | | Less : sale during the year | 0.00 | |
| **Other Earmarked Funds :-** | | | Depreciation up to date | 0.00 | 0.00 |
| (Created under the provision of the trust | | | | | |
| deed or scheme or out of the Income) | | | Furniture | | |
| Building Fund | 0.00 | | Balance as per last Balance Sheet | 17,402.00 | |
| Depreciation Fund | 0.00 | | Additions during the year | 0.00 | |
| Sinking Fund | 0.00 | | Less : sale during the year | 0.00 | |
| Reserve Fund | 0.00 | | Depreciation up to date | 1,740.00 | 15,662.00 |
| Any other Fund | 0.00 | 0.00 | | | |
| | | | **Invesments :-** | | |
| **Loans (Secured or Unsecured) :-** | | | Punjab & Maharashtra Bank Deposits | | 3,92,315.00 |
| From Trustees | 0.00 | | Punjab & Maharashtra Bank Deposits | | 3,92,315.00 |
| From Other | 0.00 | 0.00 | Punjab & Maharashtra Bank Deposits | | 1,45,206.00 |
| | | | State Bank of India Bank Deposits | | 4,99,105.00 |
| **Liabilities :-** | | | State Bank of India Bank Deposits | | 77,123.00 |
| For Expenses | 96,554.00 | | | | |
| For Advances | 1,700.00 | | **Loans (Secured or Unsecured ) :-** | | |
| For Other Deposits | 13,500.00 | | Good / Doubtful | 0.00 | |
| For Sundry Credit Balance | 0.00 | | Loans Scholarships | 0.00 | |
| Kop. Chamber of Commerce Co. | 5,510.00 | | Other Loans | 0.00 | 0.00 |
| Committee Members Contribution | 27,000.00 | 1,44,264.00 | | | |
| Advance | | | **Advances :-** | | |
| | | | To Trustees | 0.00 | |
| **Income and Expenditure Account :-** | | | To Employees | 0.00 | |
| Bal. as per last Balance Sheet | 2,02,091.42 | | To Contractors | 0.00 | |
| Less : Appropriation , if any | 0.00 | | To Lawyers | 0.00 | |
| Less : Deficit (As per I & E A/c) | 1,76,317.22 | 25,774.20 | To Others | 0.00 | 0.00 |
| | | | **Income Outstanding :-** | | |
| | | | Rent | 0.00 | |
| | | | Interest | 0.00 | |
| | | | Other Income | 0.00 | 0.00 |
| | | | **Cash and Bank Balances :-** | | 3,71,306.73 |
| | | | a) In Punjab and Maharashtra Co.op. | | |
| | | | Bank Savings Account | 3,40,639.42 | |
| | | | In State Bank of India Saving A/c | 16,987.00 | |
| | | | Punjab & Maharashtra Flexy A/c. | 9,942.50 | |
| | | | b) with the trustee | 0.00 | |
| | | | c) with the Manager | 0.00 | |
| | | | d) Cash in Hand | 3,737.81 | |
| **Total** | | 18,93,032.73 | **Total** | | 18,93,032.73 |

As per our report for Even date

+ Income Outstanding :
(if accounts are kept on
cash basis)
Rent :
Interest :

he above Balance Sheet to the best of
my/our contains a true account of the
funds & Liabilities & of the property
& assets of the Trust

CHETAN P. PATIL
M.No. 105790
KOLHAPUR
CHARTERED ACCOUNTANT

Dated at 16-11-2017

**Chetan P. Patil**
Chartered Accountant
Membership No. 105790

Trustee

**SCHEDULE - IX**
**[ Vide Rule 17 (1) ]**
**The Bombay Public Trusts Act, 1950**

Name of the Public Trust : **KOLHAPUR CHAMBER OF COMMERCE AND INDUSTRIES** Registration No. - **MAHA/29783/KOP**

**Income and Expenditure Account for the year ending 31-03-2017**

| EXPENDITURE | AMOUNT | AMOUNT | INCOME | AMOUNT | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|
| **To Expenditure in respect of properties :-** | | 0.00 | By Rent (Accured) | | 0.00 |
| Rates, Taxes, Cesses | | 8,788.00 | (realised) | | |
| Repairs and maintenance | | 0.00 | | | |
| Salaries | | 2,81,767.00 | By Interest (Accured) | | 1,13,070.00 |
| Insurance | | | (realised) | | |
| Depriciation | | 0.00 | On securities | 0.00 | |
| Other Expenses | | 0.00 | On Loans | 0.00 | |
| To Establishment Expenses | | 0.00 | On Bank account | 0.00 | 0.00 |
| To Remuneration to Trustee | | 0.00 | | | |
| | | 0.00 | By Dividend | | 0.00 |
| to the head of the math, including his household | | | | | |
| To Legal Exps | | 3,400.00 | By Donation in Cash or kind | | 66,700.00 |
| To Audit Fees | | 9,200.00 | | | |
| To contribution and Fees | | | By Grants | | 0.00 |
| To Amount written off : | | | | | |
| (a) Bad Debts | | | By Income from other sources | | 3,20,450.00 |
| (b) Loan Scholarship | | | Membership Fees Received | 2,29,400.00 | |
| (c) Irrecoverable rents | | | Entrance Fees Received | 800.00 | |
| (d) Other Items | | | Certification Charges Recd. | 67,700.00 | |
| To Miscellaneous Exps (As per List) | | 2,47,660.22 | Hall Maintenance Receipts | 9,050.00 | |
| To Depreciation | | 1,740.00 | Committee Membership | 13,500.00 | |
| To Amount transferred to Reserve or specific funds. | | 0.00 | Contribution | | |
| To Expenditure on object of the Trust :- | | | | | |
| a. Religious | 0.00 | | | | |
| b. Educational | 0.00 | | | | |
| c. Medical Relief | 0.00 | | | | |
| d. Relief of poverty | 0.00 | | | | |
| e. Other Charitable objects | 1,23,982.00 | 1,23,982.00 | By Deficit Carried over to B/s. | | 1,76,317.22 |
| **TOTAL** | | **6,76,537.22** | **TOTAL** | | **6,76,537.22** |

As per our report of Even date

+Strike off whichever is not applicable

CHETAN P. PATIL M.No. 105790 KOLHAPUR CHARTERED ACCOUNTANT

Dated at 16-11-2017

**Chetan P. Patil**
Chartered Accountant
Membership No. 105790

Trustee

List of Miscellaneous Expenses

| PARTICULARS | AMOUNT(RS) |
|---|---|
| Printing & Stationery | 34,565.75 |
| Postage & Telephone Expenses | 18,987.00 |
| Travelling Expenses | 15,722.95 |
| Election Expenses | 52,133.00 |
| Executive Committee Annual Meeting Expenses | 95,597.00 |
| Executive Committee Meeting Expenses | 2,868.00 |
| Sundry Expenses | 7,390.00 |
| Office Expenses | 7,906.00 |
| News Paper Expenses | 4,706.00 |
| Bank Charges | 494.52 |
| Electricity Expenses | 7,290.00 |
| Total Rs. | **2,47,660.22** |

**Other Charitable Objects**

| PARTICULARS | AMOUNT (RS) |
|---|---|
| Advertisement Expenses | 27,000.00 |
| Membership Subscription | 7,930.00 |
| Seminar Expenses | 85,717.00 |
| Felicitation Expenses | 3,335.00 |
| **Total Rs.** | **1,23,982.00** |

निर्याती विषयी ... सर्व काही.... **विशेष परिसंवाद**



**सन्माननीय अतिथी**

**श्रीमती गीता मुरलीधर** | चेअरमन - ECGC

**श्री. डेव्हिड रशकिन्हा** | मेनेजिंग डायरेक्टर- EXIM Bank

**श्री. ललित कानोडीया** | अध्यक्ष -IMC Chamber of Commerce

**श्री. अरविंद प्रधान** | डायरेक्टर जनरल - IMC - DGFT

**श्रीमती ख्याती नरवणे** | जॉईंट डायरेक्टर - IMC

**श्री. संभाजीराजे छत्रपती** | खासदार

**श्री. धनंजय महाडीक** | खासदार

मंगळवार दि. १२ डिसेंबर २०१७ सकाळी १०.०० वाजता

स्थळ : राजर्षि शाहू स्मारक भवन, दसरा चौक, कोल्हापूर

# कोल्हापूर चेंबरद्वारा आयोजित विविध विषयांवरील कार्यक्रम



पत्रकार परिषदेस उपस्थित चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव व मानद सचिव हरिभाई पटेल

## नवीन कार्यकारीणीच्या पहिल्या बैठकीची पत्रकार परिषद

**कोल्हापूर (३१ जानेवारी २०१७)** : जिल्ह्यातील व्यापार–उद्योगाची शिखर संस्था या नात्याने व्यापार–उद्योग व व्यवसाय क्षेत्राच्या विकासासाठी, या क्षेत्राला लागणारे नवीन तंत्रज्ञान उपलब्ध करून देण्यासाठी, तसेच युवकांना स्वयंरोजगाराच्या संधी व कौशल्य विकास प्रशिक्षण मिळणेसाठी 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' तर्फे 'स्वतंत्र प्रशिक्षण विभाग' सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती व चेंबरच्या नवीन कार्यकारीणीच्या पहिल्या बैठकीत घेतलेल्या महत्वपूर्ण निर्णयांची माहिती चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी आयोजित पत्रकार परिषदेत दिली. यावेळी चेंबरचे उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव धनंजय दुग्गे, हरिभाई पटेल, शिवाजीराव पोवार उपस्थित होते.

## कोल्हापूर चेंबरच्यावतीने 'भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची दिशा' या विषयावर परिषदेचे आयोजन

**अर्थक्रांतीचे संस्थापक व नोटबंदीचे संकल्पक अनिल बोकील यांची विशेष उपस्थिती**

**कोल्हापूर (२० फेब्रुवारी २०१७)** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स'च्या वतीने केशवराव भोसले नाट्यगृहात आयोजित केलेल्या परिषदेत 'भारतीय अर्थव्यवस्थेच्या वाटचालीची दिशा' या विषयावर 'अर्थक्रांति' चे संस्थापक व नोट बंदीचे संकल्पक अनिल बोकील यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक बी. के. आर्सेकर यांच्यासह कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, पदाधिकारी व सर्व संचालक उपस्थित होते. प्रतिवर्षी नवउद्योजकांना बापू जाधव स्मृती पुरस्कार प्रदान करणार असल्याचे ललित गांधी यांनी जाहीर केले तसेच कोल्हापूर चेंबर, आयटी असोसिएशन यांच्यात 'ब्रँड कोल्हापूर' साठी करार केला. यावेळी आयटी असो.चे अध्यक्ष कैलास मेढे व ललित गांधी यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

या कार्यक्रमात विविध मान्यवरांचे सत्कार करण्यात आले. यावेळी बँक ऑफ इंडियाचे विभागीय व्यवस्थापक बी. के. आर्सेकर, उद्योगपती सचिन मेनन यांच्यासह चेंबरचे सर्व संचालक उपस्थित होते.




कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित परिषदेचे उद्घाटन करताना अनिल बोकील, बी.के.आर्सेकर, चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, आनंद माने, प्रदिपभाई कापडीया, हरिभाई पटेल, संजय शेटे, जयेश ओसवाल, संजय पाटील, धनंजय दुग्गे




परिषदेत मार्गदर्शन करताना अनिल बोकील

# कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज ची वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न

**कोल्हापूर (२० फेब्रुवारी २०१७)** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज (KCCI)' च्या आर्थिक वर्ष २०१५-१६ साठीची वार्षिक सर्वसाधारण सभा सोमवार दि. २० फेब्रुवारी २०१७ रोजी दुपारी, ०४:०० वा. केशवराव भोसले नाट्यगृह कोल्हापूर येथे संपन्न झाली.

चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांचे अध्यक्षतेखाली वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न झाली. यावेळी चेंबर चे पूर्व अध्यक्ष आनंद माने, प्रदिपभाई कापडीया, उपाध्यक्ष संजय शेटे, मानद सचिव जयेश ओसवाल, हरिभाई पटेल, धनंजय दुग्गे, शिवाजीराव पोवार, खजिनदार संजय पाटील, सचिन मेनन, दिलीप मोहिते, सुरेंद्र जैन, महेश धर्माधिकारी तसेच शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन चे अध्यक्ष राजु पाटील, गोकुळ शिरगांव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन चे अध्यक्ष जे. आर. मोटवाणी, ५ स्टार एम.आय.डी.सी. असोसिएशन चे अध्यक्ष संजय जोशी, कोल्हापूर इंजिनिअरींग असोसिएशनचे अध्यक्ष संजय अंगडी व चेंबर चे सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. चेंबरचे मानद सचिव जयेश ओसवाल यांनी अहवालाचे वाचन केले.

KCCI

वार्षिक सभेत विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा करण्यात आली त्यामध्ये ३१ मार्च २०१६ अखेरच्या ताळेबंदास मंजुरी देण्यात आली. सन २०१७-१८ ते २०१९-२० या त्रैवार्षिक कालावधीसाठी निवडुन आलेले नवनिर्वाचित पदाधिकारी यांच्या निवडीची नोंद घेण्यात आली. तसेच सन २०१६-१७ व २०१७-१८ या कालावधीसाठी चेतन पी. पाटील, चार्टर्ड अकौंटंट यांची ऑडीटर म्हणून नेमणुक करण्यात आली. सदस्यांनी उपस्थित केलेले प्रश्न व सुचनांचे निराकरण करण्यात आले.

चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांनी वार्षिक सभेप्रसंगी चेंबर च्या कार्याचा आढावा घेतला, ते म्हणाले की, वास्तविक सदर अहवाल हा मागील कार्यकारिणीच्या काळातील आहे. तथापी काही तांत्रिक कारणास्तव व निवडणूक प्रक्रियेमुळे सदर सभा उशीराने होत आहे व त्यामुळे नवीन कार्यकारिणी हा अहवाल सादर करीत आहे.

## 'चेंबर' च्या 'वुमन आंत्रप्रिनर विंग'चे उद्‌घाटन

**कोल्हापूर (७ मार्च २०१७)** : कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रीज तर्फे वुमन्स आंत्रप्रिनर विंगचे उद्घाटन 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स'चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या उपस्थितीत झाले. विंग बद्दल माहिती देताना गांधी म्हणाले की, युवतींना नवउद्योगासाठी प्रेरणा व सहकार्य करण्यासाठी 'चेंबर ' तर्फे 'महिला उद्यमी विभाग' सुरू करण्यात आला आहे. महिला व युवतींना कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध करून देणे, दिलेल्या प्रशिक्षणाचे व्यवसाय-उद्योग सुरू करण्यासाठी मार्गदर्शन करणे, त्यासाठी लागणारे अर्थसहाय्य उपलब्ध करून देणे, महिलांना उपलब्ध असलेल्या व्यापार-उद्योगाच्या विविध संधीबाबत मार्गदर्शन करणे या प्रमुख उद्देशाने कोल्हापूर चेंबर तर्फे 'महिला उद्यमी विभाग' स्थापन करण्यात येत असल्याचे सांगितले. कार्यक्रमास विंगच्या डॉ. स्मिता जाधव, अश्विनी दानीगोंड, सदस्या ईशा वायकुळ, शोभा पटेल, चेंबरच्या संचालिका सीमा शहा, जया गांधी, कविता घाटगे, चंद्रकांत जाधव, संजय शेटे, जयेश ओसवाल, प्रदीपभाई कापडीया, शिवाजीराव पोवार, हरिभाई पटेल, संजय पाटील आदींची उपस्थिती होती.




**कोल्हापूर चेंबरच्या 'Women Entrepreneur Wing' या महिला विभागाच्या उद्घाटनाप्रसंगी दीपप्रज्वलन करताना पुढारी पब्लिकेशन्स प्रा लि. च्या मॅनेजिंग डायरेक्टर डॉ. सौ. स्मिता योगेश जाधव सोबत अश्विनी दानीगोंड, सदस्या ईशा वायकुळ, सीमा शहा, जया गांधी, अध्यक्ष ललित गांधी, संजय शेटे, चंद्रकांत जाधव, जयेश ओसवाल, संजय पाटील इ.**

## बँकींग व्यवहारावरील अन्यायी शुल्क वाढीस चेंबरचा तीव्र विरोध

**कोल्हापूर** : खाजगी क्षेत्रातील ICICI, HDFC, Axis या तीन बँकांनी बचत खात्यावरील रोख व्यवहारासाठी लागु केलेले शुल्क हे अन्यायी असुन, जिझिया करासारख्या अशा तरतुदींना कोल्हापूर चेंबरतर्फे तीव्र विरोध करण्यात आला.

# खा. धनंजय महाडीक यांच्यासमवेत जिल्ह्याच्या प्रश्नांवर चेंबरमध्ये बैठकीत चर्चा व मार्गदर्शन




**'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज' द्वारा आयोजित 'विशेष बैठक' मध्ये मार्गदर्शन करताना खासदार धनंजय महाडीक व्यासपीठावर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, संजय शेटे, चंद्रकांत जाधव, प्रदिपभाई कापडीया, आनंद माने, जयेश ओसवाल**

**कोल्हापूर (१२ मार्च २०१७)** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स' आणि व्यापारी-उद्योजक सेवा क्षेत्रातील पदाधिकारी यांच्यावतीने विविध प्रश्नांवर चर्चा असा कार्यक्रम आयोजित केला गेला. चेंबर ऑफ कॉमर्सच्या वतीने अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते आणि उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, संजय शेटे, आनंद माने, प्रदीपभाई कापडिया यांच्या प्रमुख उपस्थितीत खासदार धनंजय महाडिक यांचा सत्कार करण्यात आला. त्याचबरोबर मॅक, स्मॅक, कोल्हापूर जिल्हा फूटवेअर असोसिएशन, किराणा भुसारी व्यापारी असोसिएशन, गोशिमा, ग्रेन मर्चंट असोसिएशन, राजारामपुरी व्यापारी असोसिएशन, कोल्हापूर प्लायवूड डिलर्स असोसिएशन, कोल्हापूर डिस्ट्रीक्ट केमिस्ट असोसिएशन, कोल्हापूर स्टोन ट्रेडर्स असोसिएशन, कोल्हापूर हॉटेल मालक संघ, कोल्हापूर टिंबर मर्चंट असोसिएशन, कोल्हापूर सीए असोसिएशन, आयटी असोसिएशन, कोल्हापूर ऑटोमोबाईल असोसिएशन, किरकोळ दुकानदार असोसिएशन, राईस मिल असोसिएशन, इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स आणि शाहुपूरी मर्चंट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी खासदार महाडिक यांच्या समोर विविध प्रश्न मांडले.

कार्यक्रमाला सीमा शहा, शिवाजीराव पोवार, राजू पाटील, वैभव सावर्डेकर, नरेंद्र माटे, महेश धर्माधिकारी यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. सुत्रसंचालन जयेश ओसवाल यांनी केले.

## व्यवसाय परवाना फी दरवाढ विरोधात चेंबरची बैठक संपन्न

**कोल्हापूर (२४ एप्रिल २०१७) :** व्यवसाय परवाना फी दरवाढ विरोधात चेंबरच्या कार्यालयामध्ये सभा घेण्यात आली. यामध्ये उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, खजिनदार संजय पाटील, मानद सचिव जयेश ओसवाल, धनंजय दुग्गे, प्रदीपभाई कापडीया आदी उपस्थित होते.





**परवाना फी वाढ रद्द संदर्भात बैठकीवेळी आयुक्त डॉ. अभिजित चौधरी यांच्याशी चर्चा करताना कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी उपस्थित शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत, जयेश ओसवाल, संजय शेटे, हरिभाई पटेल, प्रदिपभाई कापडीया, चंद्रकांत जाधव, शिवाजीराव पोवार आदि.**

# व्यवसाय परवाना फी दरवाढ विरोधात महापालिका आयुक्त श्री. अभिजीत चौधरी यांना निवेदन देऊन चर्चा

**कोल्हापूर (२५ एप्रिल २०१४)** : महापालिकेच्यावतीने विविध व्यवसायांसाठी देण्यात येणाऱ्या परवाना फी च्या दरवाढीस कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज बरोबर विविध व्यावसायिक संघटनांचा विरोध आहे. त्यामुळे ही दरवाढ रद्द करावी अशी मागणी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स च्या शिष्टमंडळाने महापालिकचे नुतन आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांच्याकडे करण्यात आली.

यावेळी आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, महापौर हसीना फरास व उपमहापौर अर्जुन माने यांना निवेदनही सादर करण्यात आले.

आयुक्तांसोबत चर्चेवेळी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव जयेश ओसवाल, धनंजय दुग्गे, शिवाजीराव पोवार, हरीभाई पटेल, प्रदिपभाई कापडीया, किरकोळ दुकानदार संघाचे संदीप वीर, जयंत गोयाणी, सराफ संघाचे माणिक जैन, कुलदिप गायकवाड, अजित कोठारी, राहुल नष्टे, बबन महाजन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन चे प्रदिप व्हरांबळे यांच्यासह महापालिकचे शहर अभियंता नेत्रदिप सरनोबत यांच्यासह व्यावसायिक उपस्थित होते.

## व्यवसाय परवाना फी दरवाढ विरोधात मा. महापौर व मा. उपमहापौर यांना दि. २७ एप्रिल २०१७ रोजी निवेदन देऊन चर्चा





कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौर हसीना फरास व उपमहापौर अर्जुन माने यांना परवाना फी वाढ रद्द करण्याचे निवेदन देताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी सोबत संजय शेटे, धनंजय दुग्गे, बबन महाजन, अजित कोठारी आदी

## आयकरातील नवीन तरतुदी संबंधी मार्गदर्शन सत्र चेंबरमध्ये संपन्न

### मार्गदर्शक मिलिंद कुलकर्णी




**कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व आयकर विभागातर्फे आयोजित विशेष मार्गदर्शन सत्रात उपस्थित व्यापारी-उद्योजकांना मार्गदर्शन करताना आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी, व्यासपीठावर प्रदिपभाई कापडीया, सी.ए. संजय वनभट्टे, ललित गांधी, संजय शेटे, हरिभाई पटेल.**

**कोल्हापूर (३ मे २०१७) :** 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स' आणि 'आयकर विभागा' तर्फे आयोजित विशेष मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयकर अधिकारी मिलिंद कुलकर्णी यांनी विशेष मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, तर प्रदिपभाई कापडीया, चार्टर्ड अकौंटट संजय वनभट्टे प्रमुख उपस्थित होते. यावेळी कोल्हापूर सराफ व्यापारी संघाचे अध्यक्ष भरत ओसवाल, राजेश राठोड, प्लायवुड डीलर्स असोसिएशनचे संजय पाटील आदी उपस्थित होते. चेंबरचे मानद सचिव हरिभाई पटेल यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष संजय शेटे यांनी आभार मानले.




**कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व विक्रिकर विभागातर्फे आयोजित जी.एस.टी मार्गदर्शन चर्चासत्रात मार्गदर्शन करताना विलास इंदलकर व्यासपिठावर डॉ. अभिजित पोरे, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, पदाधिकारी व अन्य**

## जीएसटी करप्रणाली संदर्भात मार्गदर्शन व चर्चासत्र शाहू स्मारक भवन येथे संपन्न

**कोल्हापूर (१२ मे २०१७) :** 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' व 'विक्रीकर विभाग-महाराष्ट्र शासन' यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच संलग्न व्यापारी आणि औद्योगिक संघटना यांच्या सहकार्याने नवीन जीएसटी करप्रणाली संदर्भात महत्वपुर्ण मार्गदर्शन व चर्चासत्राचे राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजन केले होते. अध्यक्षस्थानी कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी होते.

यावेळी विक्रीकर विभागाचे जॉईंट कमिशनर विलास इंदलकर, केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे, असिस्टंट कमिशनर चंद्रकांत केदार, विक्रिकर विभागाचे असिस्टंट कमिशनर डॉ. अभिजित पोरे, विक्रिकर विभागाचे डेप्युटी कमिशनर सुनिल कानगुडे, असिस्टंट कमिशन नितीन बांगर, एस.टी.पी. असोसिएशनचे अध्यक्ष श्रीकांत हेर्लेकर, इन्स्टिट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट चे अध्यक्ष अवधुत चिकोडी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी व्यापाऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे देण्यात आली.

# जीएसटीच्या जाचक तरतुदीविरोधात चेंबरमध्ये बैठक संपन्न

**कोल्हापूर (१२ व १४ जून २०१७) :** जीएसटीचे दर व जाचक तरतुदीविरोधात चेंबरमध्ये बैठक आयोजित केली गेली. बैठकीमध्ये चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव हरिभाई पटेल, शिवाजीराव पोवार, प्रदीपभाई कापडीया आदी उपस्थित होते.

# जीएसटीच्या जाचक तरतुदीविरोधात जिल्हाधिकारी कार्यालय व विक्रीकर भवनावर मोर्चा





**विक्रिकर सहआयुक्त विलास इंदलकर व कोल्हापूर जिल्ह्याचे उपजिल्हाधिकारी विवेक आगवणे यांना विविध मागण्यांचे निवेदन देऊन चर्चा करताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, संजय शेटे, धनंजय दुग्गे, प्रदिपभाई कापडीया, जयेश ओसवाल, वैभव सावर्डेकर, संदिप अथणे, हरीभाई पटेल आदि.**

**कोल्हापूर (१५ जून २०१७)** : जीएसटी मधील जाचक तरतुदी वगळाव्यात, जीवनावश्यक वस्तु व कापडांवर जीएसटी लावू नये, जीएसटी प्रक्रिया सुटसुटीत करावी या व अन्य मागण्यांसाठी 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' च्या वतीने सहयोगी व संलग्न संस्थांच्या सहभागाने १ दिवसाचा लाक्षणिक बंद पाळण्यात आला व चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली व्यापारी-उद्योजकांच्या प्रतिनिधिमंडळाने विक्रिकर भवन येथे विक्रिकर सहआयुक्त इंदलकर यांची भेट घेऊन निवेदन सादर करण्यात आले.

विक्रिकर सहआयुक्त यांनी चेंबरतर्फे दिलेल्या निवेदनातील सर्व मागण्या तात्काळ शासनाकडे पाठविण्याचे आश्वासन दिले.

तत्पूर्वी चेंबर ऑफ कॉमर्स चे पदाधिकारी व विविध संघटनांचे पदाधिकारी यांनी 'चेंबर' च्या कार्यालयातून शहरभर रॅली काढून जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हापुरवठा अधिकारी व उपजिल्हाधिकारी विवेक आगवणे यांना निवेदन देऊन भुमिका मांडली श्री आगवणे यांनी चेंबर ऑफ कॉमर्स चे निवेदन शासनाकडे पाठवण्याचे आश्वासन दिले. 'चेंबर ऑफ कॉमर्स' च्या पदाधिकाऱ्यांनी केंद्रीय उत्पादन शुल्क विभागाचे आयुक्त के श्रीवास्तव यांना भेटुन निवेदन दिले. श्री. श्रीवास्तव यांनी सरकार आवश्यकते प्रमाणे 'जीएसटी' प्रणालीमध्ये सुधारणा करण्यास अनुकूल असल्याचे सांगून तांत्रिक त्रुटींबाबतच्या समस्या सरकारच्या निदर्शनास आणुन त्या तात्काळ दुर करण्यासंबंधी कार्यवाहीचे आश्वासन दिले.




**नोंदणीकृत निर्यात प्रणाली च्या मार्गदर्शन कार्यशाळेत मार्गदर्शन करताना धनंजय शर्मा, व्यासपीठावर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, जयेश ओसवाल व अजित शहा.**

# 'निर्यातीसाठी युरोपीयन देशातील ग्राहकांचा शोध' या विषयावर चेंबरमध्ये चर्चासत्र संपन्न

### मार्गदर्शक - श्री. धनंजय शर्मा, उपसंचालक, फीओ

**कोल्हापूर (१३ जून २०१७) :** निर्यातीसाठी युरोपीयन देशातील ग्राहकांचा शोध या विषयावर भारत सरकारच्या 'फीओ' व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲंड इंडस्ट्रीज यांच्या संयुक्त विद्यमाने विशेष मार्गदर्शन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी होते. 'फीओ' चे उपसंचालक धनंजय शर्मा तसेच निर्यातविषयक तज्ञ अजित शहा यांनी मार्गदर्शन केले.यावेळी चेंबरचे मानद सचिव जयेश ओसवाल यांच्यासह जिल्ह्यातील विविध निर्यातदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# 'तंत्रज्ञानाच्या वापराने गुणवत्ता वाढ' या विषयावर चर्चासत्र संपन्न

### मार्गदर्शक - श्री. शेखर जितकर

**कोल्हापूर (६ जुलै २०१७) :** कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स, सिमेन्स इन्डस्ट्री सॉफ्टवेअर (जर्मनी) तसेच इफिसिएंट मॅन्युफॅक्चरींग (ई एम) मॅगझिन यांच्या संयुक्त विद्यमाने ''तंत्रज्ञानाच्या वापराने उत्पादन गुणवत्ता वाढ'' या रेसीडेन्सी क्लब, कोल्हापूर येथे विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास सिमेन्स चे विपनन व्यवस्थापन विनित वारीकू, औद्योगिक सल्लागार निलोत्पल कुमार, ई एम मॅगझिन चे शेखर जितकर, सागर ताम्हाणे तसेच औद्योगिक क्षेत्रांतील ज्येष्ठ उद्योजक रामप्रताप झंवर, बाबाभाई वसा, योगेश कुलकर्णी, अमोद कुलकर्णी, नितिन वाडीकर, प्रसाद सौंदलगेकर, महेश बिरांगी यांची प्रमुख उपस्थिती होती.




**चेंबर ऑफ कॉमर्स व सिमेन्स द्वारे आयोजित चर्चासत्रात अध्यक्ष ललित गांधी यांचे स्वागत करताना सिमेन्स चे विनित वारीकू दुसऱ्या फोटोमध्ये मार्गदर्शन करताना ललित गांधी**

यावेळी कोल्हापूर चेंबरचे उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, संजय शेटे, मानद सचिव धनंजय दुग्गे, शिवाजीराव पवार, प्रदिपभाई कापडीया व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.




**कोल्हापूर चेंबर तर्फे आयोजित संवाद व विशेष सत्कार समारंभाप्रसंगी उद्योगपती संजय घोडावत यांचा सत्कार करताना अध्यक्ष ललित गांधी सोबत म्हाडा चे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, आनंद माने, प्रदिपभाई कापडीया, संजय शेटे, जयेश ओसवाल**




**उपस्थितांना मार्गदर्शन करताना उद्योगपती संजय घोडावत.**

# मा. संजय घोडावत व मा. समरजितसिंह घाटगे यांचे चेंबरमध्ये संवाद व विशेष सत्काराचे आयोजन

**कोल्हापूर (२८ जुलै २०१७) :** 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' तर्फे उद्योगपती संजय घोडावत व पुणे विभागाचे 'म्हाडा' चे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे यांच्याशी संवाद व विशेष सत्काराचे आयोजन चेंबर च्या शिवाजीराव देसाई सभागृहात करण्यात आले. यावेळी उद्योगपती संजय घोडावत व समरजितसिंह घाटगे यांचा गौरव करण्यात आला. कोल्हापूर इलेक्ट्रॉनिक्स डिलर्स असोसिएशनच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल संदिप नष्टे व नुतन अकरा संचालक व कार्यकारिणीचा तसेच गोकुळ शिरगांव मॅन्यफॅक्चरर्स असोसिएशन च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सुरजितसिंह पवार यांचाही सत्कार करण्यात आला. यावेळी कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, माजी अध्यक्ष आनंद माने, प्रदिपभाई कापडीया, मानद सचिव हरिभाई पटेल, धनंजय दुग्गे, शिवाजीराव पोवार, खजानिस संजय पाटील, प्रदिप शहा, नेमचंद संघवी, स्वप्नील शहा, नयन प्रसादे, संदिप अथणे, रमेश कारवेकर, शिवराज जगदाळे, योगेश कुलकर्णी, वैभव सावर्डेकर, राहुल नष्टे, डी डी पाटील, नितीन धुत, तौफीक मुल्लाणी, संभाजी पवार, प्रकाश मालाडकर, अजित होनोले, सीमा शहा, बाबा कोंडेकर, विनोद डुणुंग, अतुल शहा, संजय डोईजड आदिंसह चेंबरचे पदाधिकारी, संचालक, सभासद व उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. चेंबर चे मानद सचिव जयेश ओसवाल यांनी सुत्रसंचालन केले तर आभार उपाध्यक्ष संजय शेटे यांनी मांडले.

## महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष श्री. संतोष मंडलेचा यांचे समवेत वार्तालाप चेंबर कार्यालयात संपन्न




**महाराष्ट्र चेंबरचे अध्यक्ष संतोष मंडलेचा यांचा सत्कार करताना कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत जयेश ओसवाल, शिवाजीराव पोवार, चंद्रकांत जाधव, आनंद माने व हरीभाई पटेल.**

**कोल्हापूर (४ नोव्हेंबर २०१७) :** महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे नुतन अध्यक्ष संतोष मंडलेचा यांनी चेंबर कार्यालयास भेट दिली. यावेळी कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी त्यांचा चेंबरच्या वतीने सत्कार केला.

यावेळी जयेश ओसवाल, बाबासो कोंडेकर, चंद्रकांत जाधव, राजु पाटील, सुरजीतसिंग पोवार, हरीश्चंद्र धोत्रे, लक्ष्मीदास पटेल, हरीभाई पटेल, आनंद माने, शिवाजीराव पोवार, राहुल नष्टे, विनोद डुणुंग आदि मान्यवर उपस्थित होते.

## गोशीमा, कोल्हापूर येथे चेंबर व सर्व औद्योगिक संघटनांची महत्त्वाच्या प्रश्नासंबंधी संयुक्त सभा

**गोकुळ शिरगांव (८ नोव्हेंबर २०१७) :** गोशिमाच्या कार्यालयात चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्ह्यातील गोकुळ शिरगाव मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, शिरोली मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन ऑफ कागल अँड हातकणंगले यांची संयुक्त बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीसाठी चेंबर ऑफ कॉमर्सचे उपाध्यक्ष संजय शेटे, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, गोशिमाचे अध्यक्ष सुरजितसिंग पवार, स्मॅकचे अध्यक्ष राजू पाटील, मॅकचे अध्यक्ष हरिश्चंद्र धोत्रे, सी. आय. आय. चे अध्यक्ष योगेश कुलकर्णी, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशनचे अध्यक्ष बाबासो कोंडेकर तसेच सर्व औद्योगिक संस्थेचे पदाधिकारी, संचालक व उद्योजक उपस्थित होते.



**गोशिमा कार्यालयामध्ये आयोजित बैठकीमध्ये कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव,संजय शेटे यांचे स्वागत करताना सुरजितसिंग पवार सोबत राजू पाटील, हरिश्चंद्र धोत्रे, योगेश कुलकर्णी, बाबासो कोंडेकर आदी.**



**'इनव्हेस्ट इन कोल्हापूर' या प्रदर्शनाचे उद्घाटन करताना खासदार धनंजय महाडीक, चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, संजय किर्लोस्कर, सुरेंद्र जैन, योगेश कुलकर्णी, संजय जोशी व अन्य मान्यवर**

## 'इनव्हेस्ट इन कोल्हापूर' हे औद्योगिक प्रदर्शन संपन्न

**कोल्हापूर (१८ नोव्हेंबर २०१७) :** 'मेक इन इंडिया'च्या धर्तीवर कोल्हापुरात 'इनव्हेस्ट इन कोल्हापूर' हे प्रदर्शन कॉन्फिडरेशन ऑफ इंडियन इंडस्ट्रीतर्फे (सीआयआय) संपन्न झाले. या प्रदर्शनास कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अ‍ॅण्ड इंडस्ट्रिज, गोशिमा, स्मॅक, फौंड्रीमन असोसिएशन, मॅक, स्लिमा, कोल्हापूर इंजिनिअरिंग असोसिएशन, उद्यम सोसायटी, एमएसएमई आदी संस्थांचे सहकार्य राहिले.

## कोल्हापूर चेंबर व फिओ तर्फे 'जीएसटी फॉर एक्सपोर्टर्स' कार्यशाळा संपन्न




**निर्यातधारकांसाठी जीएसटी कार्यपद्धती यावर मार्गदर्शन करताना धनंजय शर्मा, सोबत मिहीर शहा, जयेश ओसवाल व शिवानंद औंधकर**

**कोल्हापूर (१९ नोव्हेंबर २०१७) :** कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स व फिओ यांच्या संयुक्त विद्यमाने निर्यातदारांसाठी जीएसटी कार्यपद्धती या विषयावर एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. कार्यशाळेस फिओ चे धनंजय शर्मा, मिहीर शहा यांनी मार्गदर्शन केले. यावेळी चेंबरचे मानद सचिव जयेश ओसवाल व अन्य मान्यवर उपस्थित होते.

# चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे उद्धव ठाकरे यांना निवेदन



शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना विविध मागण्यांचे निवेदन देताना जयेश ओसवाल, संजय शेटे, आनंद माने

**कोल्हापूर (२५ नोव्हेंबर २०१७) :** चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

जीवनाश्यक वस्तूवरील जीएसटी रद्द करणे, जीएसटीची अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणी दूर करणे, कापड व चप्पलावरील जीएसटी रद्द करणे, सराफ व्यावसायिकांच्या अडचणी दूर कराव्यात, औषधांवरील जीएसटी दर कमी करणे, मुंबई–बेंगलोर कॉरीडॉरची अंमलबजावणी करणे, छोट्या व्यावसायिकांना नवीन कायद्यामुळे निर्माण झालेल्या अडचणी दूर करणे, उद्योजकांसाठी एमआयडीसीमध्ये असलेली जागेची कमतरता दूर करणे आदी मागण्यांचा निवेदनात समावेश होता.

यावेळी चेंबरचे उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव जयेश ओसवाल, शिवाजीराव पोवार, खजानिस संजय पाटील, आनंद माने व पदाधिकारी उपस्थित होते.




चेंबरद्वारा आयोजित प्रतिनिधींच्या संवाद कार्यक्रमामध्ये मार्गदर्शन करताना माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, व्यासपीठावर माजी मंत्री पतंगराव कदम, पी. एन. पाटील, आम. सतेज पाटील, ललित गांधी, संजय शेटे व आनंद माने

# चेंबरच्यावतीने माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांच्यासमवेत व्यापाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन

**कोल्हापूर (१ डिसेंबर २०१७) :** कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजतर्फे व्यापारी–उद्योजक यांच्याशी संवाद कार्यक्रम पॅव्हेलियन हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमास MPCC अध्यक्ष, माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण, माजी मंत्री पतंगराव कदम, काँग्रेस जिल्हाध्यक्ष पी.एन. पाटील, आम. सतेज पाटील यांची प्रमुख उपस्थित होती.

कोल्हापूर जिल्ह्यातील उद्योजक, व्यापाऱ्यांच्या संघटनांनी आपल्या प्रश्नांचे निवेदन अशोक चव्हाण यांना दिले. संघटनेचे अध्यक्ष, प्रतिनिधींनी या अनुषंगाने मुद्दे मांडले. यावर चव्हाण यांनी संबंधित प्रश्न सोडविण्याचे आश्वासन दिले.

यावेळी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, संजय शेटे, आनंद माने, राजु पाटील, बाबासो कोंडेकर, सुरजित पवार, हरीश्चंद्र धोत्रे, किशोर तांदळे, सदानंद कोरगांवकर, तौफीक मुल्लाणी आदी उपस्थित होते.

## कोल्हापूर चेंबरद्वारा सादर केलेली निवेदने

# 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स'च्या शिष्टमंडळाची नाम. शरद पवार यांच्याशी भेट

**कोल्हापूर** : कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने 'पद्म विभुषण' पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी श्री. शरद पवार यांची भेट घेतली. चेंबरच्या शिष्टमंडळाशी व्यापार–उद्योगाच्या सद्यस्थितीबद्दल विस्तृत चर्चा केली. ललित गांधी यांनी त्यांना उद्योग क्षेत्रासमोरच्या नेमक्या अडचणी काय आहेत व त्यावर उपाययोजना काय अपेक्षित आहेत याबद्दल विविध प्रश्न विचारले.

यावेळी झालेल्या चर्चेत उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव, आनंद माने, संजय शेटे, संजय पाटील यांनी सहभाग घेतला.



ज्येष्ठ नेते मा. शरद पवार यांच्यासोबत चर्चा करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, आनंद माने, चंद्रकांत जाधव

# केंद्रीय वस्त्रोद्योगमंत्री नाम. स्मृती ईराणी यांची वस्त्रोद्योगातील अडचणी व अपेक्षांसंदर्भात भेट



**वस्त्रोद्योगातील अडचणी व अपेक्षांसंदर्भात केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नाम. स्मृती ईराणी यांना निवेदन देऊन चर्चा करताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, सोबत 'असोचेम' चे नवनिर्वाचित अध्यक्ष संदिप जाजोदीया.**

**नवी दिल्ली** : वस्त्रोद्योग क्षेत्रातील विविध अडचणी दुर करून या क्षेत्राला विशेष प्रोत्साहन देणारी योजना जाहीर करावी यासाठी 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय वस्त्रोद्योग मंत्री नाम. स्मृती ईराणी यांची भेट घेऊन चर्चा केली.




**केंद्रीय नागरी विमान मंत्री नाम. जयंत सिन्हा यांना 'कोल्हापूर' व 'महाराष्ट्रातील' विमानतळ सुरू करण्यासंबंधी निवेदन देताना चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी सोबत 'असोचेम' चे मावळते अध्यक्ष सुनील कानोडीया.**

# कोल्हापूर व महाराष्ट्रातील विमानतळासंदर्भात केंद्रीय नागरी विमान मंत्री नाम. जयंत सिन्हा यांची भेट

**नवी दिल्ली** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय नागरी उड्डाण राज्यमंत्री नाम. जयंत सिन्हा यांची भेट घेऊन 'कोल्हापूर' विमानतळ तात्काळ सुरू करण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.



**केंद्रीय कामगार मंत्री नाम. बंडारू दत्तात्रेय यांना निवेदन देऊन चर्चा करताना चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी.**

# कर्मचारी विमा योजनेचे हॉस्पिटल सुरू करणेबाबत केंद्रीय कामगारमंत्री नाम. बंडारू यांची भेट

**नवी दिल्ली** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी केंद्रीय कामगार मंत्री बंडारू दत्तात्रेय यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कोल्हापूरातील कर्मचारी विमा योजनेचे हॉस्पीटल लवकरात लवकर सुरू करण्याबाबत निवेदन देऊन चर्चा केली.

# एल.बी.टी. विषयक समस्यांसंदर्भात नगरविकास राज्यमंत्री रणजित पाटील यांची भेट



**नगरविकास राज्यमंत्री नाम. रणजित पाटील यांना कोल्हापूर महानगरपालिकेतील LBT असेसमेंट प्रक्रियेला स्थगिती मिळणेबाबतचे निवेदन देऊन चर्चा करताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत अमृत शहा.**

**मुंबई** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स'चे अध्यक्ष ललित गांधी यांनी नगरविकास राज्यमंत्री नाम. रणजित पाटील यांची मुंबई येथे भेट घेऊन कोल्हापूर महानगरपालिकेतील LBT असेसमेंट प्रक्रियेला स्थगिती मिळणेबाबतचे निवेदन देऊन चर्चा केली.

# केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभू यांचा सत्कार




**केंद्रीय रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांचे स्वागत करताना कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी.**

**कोल्हापूर** : मध्यरेल्वेच्या विविध विकास प्रकल्पांचा प्रारंभ आणि लोकार्पण सोहळा रेल्वेमंत्री सुरेश प्रभु यांच्या प्रमुख उपस्थितीत कोल्हापूर येथे झाला. कार्यक्रमास खासदार संभाजीराजे छत्रपती, धनंजय महाडीक, राजू शेट्टी, प्रकाश हुक्केरी, महापौर हसीना फरास, मध्य रेल्वेचे महाव्यवस्थापक श्री. शर्मा, कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, आनंद माने, संजय शेटे, जयेश ओसवाल आदि प्रमुख उपस्थित होते.

# 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स' तर्फे पद्मभुषण राजश्री बिर्ला यांचे स्वागत व सत्कार



**श्रीमती राजश्री बिर्ला यांचे स्वागत करून निमंत्रण देताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, नितिन धूत, महेश सामंत याप्रसंगी उपस्थित मधुरीमाराजे, प्रमोद पाटील इ. मान्यवर.**

**कोल्हापूर** : कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स च्या वतीने पद्म भुषण श्रीमती राजश्री बिर्ला यांचे स्वागत करून त्यांना चेंबरतर्फे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

# एल.बी.टी. साठी संयुक्त बैठक आयोजित करू - मनीषा म्हैसकर

## 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स' च्या शिष्टमंडळास आश्वासन

**मुंबई** : कोल्हापूर महानगरपालिका क्षेत्रातील एल.बी.टी. असेसमेंट मध्ये निर्माण झालेल्या अडचणीतुन मार्ग काढण्यासाठी कोल्हापूर महानगरपालिका अधिकारी, चेंबर ऑफ कॉमर्स चे शिष्टमंडळ यांची राज्य शासन स्तरावर संयुक्त बैठक आयोजित करू अशी ग्वाही नगरविकास खात्याच्या प्रधान सचिव श्रीमती मनीषा म्हैसकर (IAS) यांनी दिली. 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी अन्य पदाधिकाऱ्यांसह मंत्रालयात त्यांची भेट घेऊन चर्चा केली त्यावेळी त्यांनी ही माहिती दिली.



**जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत अमित सैनी यांच्या समवेत चर्चा करताना कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, संजय शेटे, महेश सामंत, शिवाजीराव पोवार, धनंजय दुग्गे, हरीभाई पटेल, कांतीभाई पटेल**

# 'कौशल्य विकास योजनांच्या अंमलबजावणीसाठी जिल्हाधिकारी सैनी यांची भेट

**कोल्हापूर** : 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने कौशल्य विकास क्षेत्रासाठी सुरू केलेल्या व प्रस्तावित कार्याच्या तसेच विविध प्रश्नांसाठी जिल्हाधिकारी अमित सैनी यांच्या समवेत बैठक घेतली.

यावेळी झालेल्या चर्चेत संजय शेटे, हरीभाई पटेल, शिवाजीराव पोवार, धनंजय दुग्गे, महेश सामंत, कांतिभाई पटेल यांनी सहभाग घेतला.

# कोल्हापूरच्या नुतन जिल्हाधिकाऱ्यांचे स्वागत



**कोल्हापूर** : कोल्हापूरचे नुतन जिल्हाधिकारी श्री अविनाशजी सुभेदार (IAS) यांचे कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी यांनी पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले व त्यांच्या यशस्वी कारकीर्दीसाठी शुभेच्छा दिल्या.



**नवी दिल्ली : महाराष्ट्र शासनाच्या 'महाराष्ट्र इन्फो सेंटर' नवी दिल्ली येथे कार्यरत उपसंचालक श्री दयानंद कांबळे यांनी ललित गांधी यांना 'फिक्की' च्या संचालकपदी व 'कोल्हापूर चेंबर' च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल त्यांनी पुष्पगुच्छ देवुन सत्कार केला.**



**भारत सरकारच्या सहसचिव व्ही. राधा यांच्या बैठकीपूर्वी केंद्रीय जीएसटी विभागाचे आयुक्त विद्याधर थेटे यांचा पुष्पगुच्छ देताना कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी.**

## केंद्रीय व राज्य वस्तू व सेवा कर (सीजीएसटी) आणि (एसजीएसटी) यांच्या संयुक्त विद्यमाने संयुक्त बैठकचे आयोजन

**कोल्हापूर :** केंद्रीय व राज्य वस्तू व सेवा कर (सीजीएसटी) आणि (एसजीएसटी) यांच्या संयुक्त विद्यमाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील चेंबर ऑफ कॉमर्स, उद्योग व व्यापारी संस्था व त्यांचे प्रतिनिधी यांची संयुक्त बैठक येथे झाली. बैठकीस कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी व अन्य संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी भारत सरकारच्या सहसचिव व्ही.राधा, केंद्रीय जीएसटी विभागाचे आयुक्त विद्याधर थेटे यांनी उद्योगांना केंद्रीय व राज्य जीएसटी भारताना येणाऱ्या समस्या व त्यासाठी कोणत्या उपाययोजना कराव्यात, याबाबतची माहिती घेतली.

यावेळी केंद्रीय वस्तू व सेवा कर विभागाचे अतिरिक्त आयुक्त श्रीवास्तव, राज्य वस्तू व सेवा कर विभागाचे सह आयुक्त विलास इंदलकर, उपायुक्त सचिन जोशी, उपायुक्त डी.एम.हुक्केरी, सहआयुक्त डॉ. अभिजित पोरे यांच्यासह अधिकारी व व्यापारी संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## कोल्हापूर चेंबरच्या अध्यक्षांची विविध कार्यक्रमांत उपस्थिती




उद्योजकांच्या मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सोबत खासदार धनंजय महाडिक, चंद्रकांत तुरखिया, योगेश कुलकर्णी, सुरजितसिंग पवार.

# प्लास्टिक उद्योजकांच्या मेळाव्याचे आयोजन

**कोल्हापूर :** अहमदाबाद (गुजरात) येथे 'प्लास्ट इंडिया प्रदर्शन' होत आहे. या पार्श्वभूमीवर कोल्हापूरात आयोजित उद्योजकांच्या मेळाव्यात खासदार धनंजय महाडीक व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रिजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्रदर्शनाचे प्रमुख चंद्रकांत तुरखिया, सीआयआयचे योगेश कुलकर्णी, गोशिमाचे अध्यक्ष सुरजितसिंग पवार, बाबा कोंडेकर, संयोजक सत्यजीत भोसले यांची प्रमुख उपस्थिती होती.



**जीएसटी व आपण विषयावरील चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन करताना ललित गांधी व्यासपीठावर मनीष झंवर, सुरेंद्र जैन, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. जे.एफ.पाटील, डॉ. विजय ककडे.**

## कोल्हापूर चेंबर, शिवाजी विद्यापीठ व अन्य संस्थांच्या संयुक्त विद्यमाने जीएसटी व आपण चर्चासत्राचे आयोजन

**कोल्हापूर :** कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स, शिवाजी विद्यापीठ, बँक ऑफ इंडिया आणि कोल्हापूर इन्व्हेस्टर्स असोसिएशनच्यावतीने आयोजित 'जीएसटी व आपण' चर्चासत्र राजर्षी शाहू स्मारक भवन येथे आयोजित करण्यात आले होते.

चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. चर्चासत्रामध्ये जीएसटी संदर्भात माहिती देण्यात आली.

यावेळी ज्येष्ठ अर्थतज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, वस्तु व सेवा कर विभागाचे सहायक आयुक्त अश्विनकुमार उके यांनी या चर्चासत्रामध्ये मार्गदर्शन केले.

यावेळी उद्योजक सुरेंद्र जैन, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, मनीष झंवर यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन केले. डॉ. ए. एम. गुरव यांनी स्वागत केले. डॉ. एम. एम. देशमुख यांनी आभार मानले.




**शिरोली मॅन्युफॅक्चर्स असोसिएशन (स्मॅक) च्या वतीने कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज च्या अध्यक्षपदी श्री. ललित गांधी यांची निवड झाल्याबद्दल असोसिएशनच्या कै. मोहनराव शिरगांवकर हॉल मध्ये सत्कार करण्यात आला. यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष राजु पाटील, उपाध्यक्ष दिपक परांडेकर, संचालक मंडळातील सदस्य उपस्थित होते.**

## शिवाजी विद्यापीठात 'इन्डस्ट्री-ॲकेडमीआ मीट' मध्ये चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांचे मार्गदर्शन



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे त्यांच्या 'युनिव्हर्सिटी इन्डस्ट्री इन्टरॅक्शन सेंटर' व 'सेंटर ऑफ स्कील ॲण्ड आंत्रप्रिनरशिप डेव्हलपमेंट' या विभागातर्फे आयोजित 'इन्डस्ट्री–ॲकेडमीआ मीट' मध्ये 'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज' चे अध्यक्ष ललित गांधी यांनी 'स्टार्ट अप' योजनेखाली मार्गदर्शन केले.विद्यापीठाचे रजिस्ट्रार डॉ. व्ही. डी. नांदवडेकर व उद्योजक प्रताप पुराणिक यांनी उद्घाटन केल्यानंतर उद्योजक संग्राम पाटील, सचिन शिरगांवकर, सुरेंद्र जैन, एस.व्ही.सुतार यांनी विविध सत्रात मार्गदर्शन केले.

## माहिती व जनसंपर्क महासंचालनालयद्वारा अर्थसंकल्प चर्चासत्राचे आयोजन




**'अर्थसंकल्प राज्याचा, संकल्प विकासाचा' या विषयावरील चर्चासत्रात उपस्थित चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व्यासपीठावर प्रा. डॉ. विजय ककडे, डॉ. नितिन नायर, दशरथ पारेकर, जॉर्ज क्रुझ आदि.**

**कोल्हापूर :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालाच्या विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर आणि जिल्हा माहिती कार्यालय, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'अर्थसंकल्प राज्याचा, संकल्प विकासाचा' या विषयावरील चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.

शिवाजी विद्यापीठाच्या अर्थशास्त्र विभागाचे प्रमुख व अर्थतज्ञ प्रा. डॉ. विजय ककडे, भारती विद्यापीठाच्या मॅनजमेंट इन्स्टिट्युटचे संचालक डॉ. नितिन नायक, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललीत गांधी, जेष्ठ संपादक दशरथ पारेकर आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शक जॉर्ज क्रुझ यांनी सहभागी होऊन अर्थसंकल्पावर सविस्तर विश्लेषण केले. चर्चासत्राच्या प्रारंभी कोल्हापूर विभागाचे माहिती उपसंचालक सतीश लळीत यांनी चर्चासत्राची रूपरेषा विशद केली. सहायक संचालक एस.आर.माने यांनी स्वागत केले. जिल्हा माहिती अधिकारी वर्षा पाटोळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. यावेळी जेष्ठ संपादक दशरथ पारेकर व विविध वृत्तपत्रांचे, इलेक्ट्रनिक प्रसारमाध्यमांचे प्रतिनिधी व मान्यवर उपस्थित होते.

## देशातील दुसऱ्या आणि राज्यातील पहिल्या क्रमांकाच्या

# सर्वात उंच ध्वजाचे कोल्हापूर मध्ये अनावरण



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, अभिनेता अक्षय कुमार, गृह राज्यमंत्री दिपक केसरकर, आमदार राजेश क्षीरसागर यांच्यासमवेत ललित गांधी**



**महसुल मंत्री चंद्रकांतदादा पाटील, अभिनेता अक्षय कुमार, आमदार अमल महाडीक यांच्या समवेत ललित गांधी.**

**कोल्हापूर** : देशाच्या वाघा बॉर्डर नंतर दुसऱ्या क्रमांकाचा आणि महाराष्ट्र राज्यातील पहिलाच ३०३ फुट उंचीच्या ध्वज स्तंभाच्या लोकार्पणासाठी कोल्हापूर येथे विशेष उपस्थित असलेले सन्माननीय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, चित्रपट अभिनेता अक्षय कुमार, गृह राज्यमंत्री दिपक केसरकर यांचे वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स व कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रीजचे अध्यक्ष ललित गांधी यांनी स्वागत केले.

लोकार्पण सोहळ्यास महसुल तथा कोल्हापूर जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांतदादा पाटील, श्रीमंत छत्रपती शाहू महाराज, खास. संभाजीराजे छत्रपति, धनंजय महाडीक, आम. अमल महाडीक, हसन मुश्रीफ, राजेश क्षीरसागर, सुजीत मिणचेकर, सतेज पाटील, सुरेश हाळवणकर, महापौर हसिना फरास, पुणे म्हाडाचे अध्यक्ष समरजितसिंह घाटगे, जिल्हापरिषद अध्यक्षा शौमिका महाडीक, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलिस महानिरीक्षक विश्वास नांगरे-पाटील, पोलिस महासंचालक सतीश माथूर, उद्योगपति संजय घोडावत, कोल्हापूर रस्ते सौंदर्यीकरण प्रकल्पाचे (KSBP) सुजय पित्रे व इतर मान्यवर उपस्थित होते.

# 'कोल्हापूर चेंबर'च्यावतीने विदेश सेवा सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा सत्कार



**विदेश सेवा सचिव डॉ. ज्ञानेश्वर मुळे यांचा सत्कार करताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी सोबत जयेश ओसवाल, धनंजय दुग्गे, संजय पाटील, महेश सामंत**



**छत्रपति शाहु महाराज यांचा सत्कार करताना चेंबरचे उपाध्यक्ष चंद्रकांत जाधव सोबत ललित गांधी, खा. धनंजय महाडीक व ज्ञानेश्वर मुळे**

**कोल्हापूर** : कोल्हापूर येथील मुख्य पोस्ट ऑफिस कार्यालयात महाराष्ट्रातील पहिले पोस्ट ऑफीस पासपोर्ट सेवा केंद्राचे उद्‌घाटन छत्रपती शाहू महाराज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात विदेश सेवा सचिव डॉ.ज्ञानेश्वर मुळे बोलत होते. यावेळी राज्यसभा खासदार संभाजीराजे छत्रपती, खासदार राजू शेट्टी, खासदार धनंजय महाडिक, महापौर हसिना फरास, पोस्टमास्टर जनरल विनोद कुमार शर्मा, जिल्हाधिकारी डॉ. अमित सैनी, पुण्याचे क्षेत्रीय पासपोर्ट अधिकारी अतुल गोतसुर्वे, महापालिका आयुक्त पी.शिवशंकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.कुणाल खेमणार, प्रवर डाक अधिक्षक रमेश पाटील, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स चे अध्यक्ष ललित गांधी, उपाध्यक्ष संजय शेटे, चंद्रकांत जाधव, मानद सचिव जयेश ओसवाल, सुरेंद्र जैन उपस्थित होते.

कोल्हापूर मध्ये पासपोर्ट कार्यालय सुरू करण्यातबाबत चेंबरद्वारे परराष्ट्र सचिव यांना केलेल्या पत्रव्यवहारास

## परराष्ट्र कार्यालयाकडून प्राप्त झालेले पत्र



DR. DNYANESHWAR M. MULAY
SECRETARY (CPV & OIA)

D.O. No. Secy (CPV & OIA)/2017

विदेश मंत्रालय, नई दिल्ली
MINISTRY OF EXTERNAL AFFAIRS
NEW DELHI

901, Akbar Bhavan, Chanakyapuri,
New Delhi-110021

March 2, 2017

Dear Shri गांधी,

I have received your letter dated 28.2.2017 wherein you have praised my Ministry's initiative to start the Passport Office in Kolhapur. As you are aware, Kolhapur is among major towns of Maharashtra and the demand for a separate passport office in Kolhapur has been pending for a very long time. I am happy that finally we will be able to provide this service to the people in Kolhapur and surrounding areas.

Personally, for me, this is a special occasion since I come from Kolhapur and being of some assistance to the citizens of Kolhapur area is a special privilege for me. Please convey my greetings to other members of the Kolhapur Chamber of Commerce & Industries. I wish you all the best in your endeavor to promote business interests in Kolhapur.

Regards,

Yours faithfully,

(Dnyaneshwar M. Mulay)

Shri Lalit Gandhi
Chairman
Kolhapur Chamber of Commerce & Industries

## शिवाजीराव देसाई यांच्या ८६ व्या जयंती निमित्त कोल्हापूर चेंबर तर्फे अभिवादन




**'कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्स अॅण्ड इंडस्ट्रीज' तर्फे स्व.शिवाजीराव देसाई यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमेला आदरांजली व्यक्त करताना चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी, संचालक नितिन धुत, महेश सामंत, शितल मिरजे, शिवानंद औंधकर**

**कोल्हापूर :** ज्येष्ठ उद्योगपती स्व. शिवाजीराव देसाई यांची ८६ व्या जयंतीनिमित्त कोल्हापूर चेंबरमध्ये शिवाजीराव देसाई सभागृहामध्ये त्यांना अभिवादन करण्यात आले. स्व. शिवाजीरावांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून आदरांजली व्यक्त केली. याप्रसंगी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, संचालक नितिन धुत, महेश सामंत, शितल मिरजे, सेक्रेटरी शिवानंद औंधकर यांच्यासह विविध मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टतर्फे बिझनेस एक्स्पो २०१७ प्रदर्शनाचे उद्‌घाटन




**सॅटर्डे क्लब ग्लोबल ट्रस्टतर्फे 'बिझनेस एक्स्पो' प्रदर्शनाचे उद्‌घाटन कॉटनकिंग चे अध्यक्ष प्रदिप मराठे, कोल्हापूर चेंबर चे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते झाडाला पाणी घालून झाले. यावेळी मनिष मिश्रा, हर्षवर्धन भुर्के, नरेंद्र बगाडे, संजय शिंदे, श्रीकृष्ण पाटील उपस्थित होते.**

## 'इंडस्ट्रिया २०१६'चे आयोजन




**इंडस्ट्रिया २०१६ मध्ये मार्गदर्शन करताना ललित गांधी व्यासपीठावर आम. सतेज पाटील, सुरेंद्र जैन, दमासिया, अरूण कुंभोजकर, सदाशिव वर्गे, सत्यजित भोसले, संजय शेटे, प्रदिपभाई कापडीया**

**कोल्हापूर :** 'मेक इन इंडिया' च्या धर्तीवर कोल्हापुरात 'मेक इन कोल्हापुर' इंडस्ट्रिया २०१६ या उद्योग प्रदर्शनाचे आयोजन केले होते. कोल्हापुर चेंबर ऑफ कॉमर्स, स्मॅक, गोशिमा, मॅक, उद्यम को-ऑप. सोसायटी, कोल्हापुर इंजिनिअरींग असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यम ने प्रदर्शनाचे आयोजन केले होते. यावेळी आ. सतेज पाटील, आ. राजेश क्षीरसागर, कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी, सुरेंद्र जैन, 'मॅक' चे अध्यक्ष संजय जोशी, रिलायन्स पॉलिमर्सचे सत्यजित भोसले, प्रदिपभाई कापडीया, संजय अंगडी, जे. आर. मोटवाणी आदि उपस्थित होते. कोल्हापूर चेंबर चे संजय शेटे यांनी आभार मानले.

# कोल्हापूर शहराच्या सौंदर्यीकरणामध्ये ‘कोल्हापूर चेंबर’चा सहभाग



केएसबीपी द्वारे आयोजित बैठकीमध्ये ललित गांधी यांचा सत्कार करताना महसुल मंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील.

**कोल्हापूर** : कोल्हापूर शहराच्या सौंदर्य करणासंदर्भात महाराष्ट्राचे महसुल मंत्री तसेच कोल्हापूरचे पालकमंत्री नाम. चंद्रकांतदादा पाटील यांच्या उपस्थितीत उद्योग क्षेत्रातील मान्यवरांची बैठक हॉटेल सयाजी येथे आयोजित करण्यात आली होती. यावेळी चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांनी शहराच्या सौंदर्यीकरणात सामाजिक जबाबदारीच्या जाणीवेतुन चेंबरचा सहभाग नोंदवला.




नवीन फोर्ड इको स्पोर्टस्‌चे अनावरण चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी फोर्डचे लक्ष्मी रामकुमार, नीरज गुप्ता, आदित्य सक्सेना, कांतीलाल चोरडिया आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



‘लिनन व्होग’ शोरूमचे उद्‌घाटन करताना ललित गांधी सोबत जयनारायण सारडा, रविंद्र मोहन, गोपाल झंवर आदि.



कन्झ्युमर्स शॉपी प्रदर्शनाचे उद्‌घाटन करताना जिल्हाधिकारी अविनाश सुभेदार शेजारी उपस्थित कोल्हापूर चेंबरचे अध्यक्ष ललित गांधी व मान्यवर




सराफ संघात मार्गदर्शन करताना भरतकुमार राणे व्यासपीठावर भाग्यश्री नवाटके, भरत ओसवाल, ललित गांधी, कुलदीप गायकवाड.

प्रेषक : **ललित गांधी** (अध्यक्ष)

**वेस्टर्न महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्रीज, ॲग्रो अ‍ॅन्ड एज्युकेशन (वेसमॅक)**
‘बिझनेस हाउस’, १६७७, ई मेन रोड,
राजारामपूरी १० वी गल्ली,
कोल्हापूर – ४१६००८ (महाराष्ट्र)

प्रति,

POSTAL : REGN. No. KLR-302/2015-2017 NAME OF POST OFFICE : RMS, KOLHAPUR
Licensed to Post without Pre-Payment of Postage : WPP License No.: GR/KLP/101/2017

Printed, Published & Edited by Lalit Gandhi (President of WESMACH) Printed at Sakal Papers Ltd, D4, MIDC, Shiroli, Kolhapur - 416 122 and published from Business House, 1677, E, Main Road, Rajarampuri, 10th Line, Kolhapur- 416008. • Ph.: 0231-2525251, Fax: 0231-2522201 • Printer /Publisher/ Editor : Lalit Gandhi • Email : westernchamber@gmail.com

• R.N.I. REGN. No. MAHMAR/2009/36262 • PUBLICATION DATE : 8 - 9 • POSTING DATE : 10TH OF EVERY MONTH